# - पुणे - बंगळुरु मार्गावर एस.टी.ची वातानुकुलित व्होल्वो - शिवनेरी सेवा सुरु-

माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर असणा-या पुणे व बंगळुरु या देशातील दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारी रा. प. महामंडळाची वातानुकुलित व्होल्वो - शिवनेरी सेवा सुरु झाली आहे. स्वारगेट - पुणे येथून सायंकाळी १७.३० वा. सुटणारी ही बस कोल्हापूर - कागल - बेळगांव - धारवाड - हुबळी - हवेरी - हरिहर - दावणगिरी - चित्रदुर्ग - टुमकुर मार्गे बंगळुरु येथे दुस-या दिवशी सकाळी ८.४५ वा. पोहोचत असून बंगळुरु येथून सायंकाळी १८.१५ वा. सुटणारी बस दुस-या दिवशी सकाळी स्वारगेट - पुणे येथे ९.३० वा. पोहोचत आहे.

पुणे - बंगळुरु हे सुमारे ८५० कि. मी. चे अंतर १५ तास १५ मिनिटांत पार पाडण्यात येत असून त्यासाठी प्रवासभाडे रु. ९००/- आकारण्यात येत आहे. पुणे - बंगळुरु प्रवास आरामदायी व सुखकर होण्यासाठी रा. प. महामंडळातर्फे बसमधील प्रवाशांना ब्लॅकेट, मिनरल वॉटर व वर्तमानपत्राची सुविधा मोफत पुरविण्यांत येत आहे.

उपरोक्त सेवा सुरु करुन रा. प. महामंडळाने पुणे व बंगळुरु या या शहारातील प्रवाशांची मागणी पूर्ण केली असून या सेवेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी केले आहे.